## महत्वाचे...

### बलेनोची धडक; पती-पत्नी जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

काळेवाडी फाटा ते रहाटणी फाटा बीआरटी मार्गावर ६ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा निळ्या रंगाच्या बलेनो कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार प्रमोद माने आणि त्यांची पत्नी किरकोळ जखमी झाले. या धडकेत त्यांची दुचाकी, मोबाईल व घड्याळाचे नुकसान झाले. अपघातानंतर कारचालक फरार झाला असून काळेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### बावधनमध्ये तरुणावर दगडफेक, मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

बावधन येथे झालेल्या भांडणाच्या रागातून दोन आरोपींनी १९ वर्षीय कार्तिक दगडे व त्याच्या मित्रांवर शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अफरोज सय्यद यालाही दगडाने मारहाण करून जखमी केले. कार्तिक आणि हर्षल भुंडे यांनाही दगडफेक करून किरकोळ जखमी करण्यात आले. या प्रकरणी गुन्हा दाखल असून आरोपी अटकेत नाहीत.

### चित्रपटगृहात वाद, दांपत्यावर मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

चिंचवड येथील एलप्रो मॉलमधील आयनॉक्स थिएटरमध्ये चित्रपटादरम्यान स्टोरी सांगू नका, असे सांगितल्याच्या रागातून अकिब पटेल आणि त्याच्या पत्नीने अभिषेक देशपांडे व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केली. या प्रकारात देशपांडे जखमी झाले असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अद्याप अटकेत नाहीत.

### ५ लाखांचा गैरवापर; तिघांविरोधात गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

दिघी येथील धन्वंतरी क्लिनिकमध्ये बिझनेसच्या नावाखाली ४२ वर्षीय महिलेने ५ लाख रुपये आरोपींकडे पाठवले. मात्र आरोपींनी ते पैसे वैयक्तिक कारणासाठी वापरून क्यूनेट कंपनीच्या नावावर खोटे व्यवहार दाखवले. या प्रकरणी महिला आरोपींसह अभिजीत राजन कानगुडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अटकेत नाहीत.

### डॉल्बी व लेझर बीमचा वापर; अध्यक्षासह तिघांविरोधात गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

आकुर्डी दत्तवाडी येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान मनाई असूनही डॉल्बी, प्रखर बीम लाईट आणि लेझर बीमचा वापर केल्याप्रकरणी शिवाजी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरज पिंजण यांच्यासह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्याद पोलीस हवालदार प्रकाश गरदरे यांनी दिली असून आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

### बेकायदेशीर जर्सी वासरांची वाहतूक उघडकीस

**पुणे । प्रतिनिधी**

रावेत येथील समीर लॉन्सजवळ पोलिसांनी गाडी क्रमांक MH१४ LX ५२८६ मधून कत्तलखान्याकडे बेकायदेशीररीत्या दोन जर्सी वासरे वाहतूक करताना प्रसाद जाधव आणि बाळा पवार यांना पकडले. प्राणी छळ व प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून गाडी व जनावरे जप्त करण्यात आली आहेत.

# ‘श्री गणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून आतापर्यंत ३.२६ लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

## राज्यात २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान ७१५९ आरोग्य शिबिरांचे आयोजन, ६,८६२ नागरिकांनी केले रक्तदान




**मुंबई । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून राबविण्यात आलेल्या ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान ७१५९ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून तब्बल ३ लाख २६ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.

तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या ९,९६० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून ९५ रक्तदान शिबिरांतून एकूण ६,८६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला. २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ दरम्यान ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ अभियानात मोफत

गणेशोत्सवासारख्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळाली. तपासणीदरम्यान आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार असल्याचे श्री. रामेश्वर नाईक, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख यांनी कळविले आहे.

**आरोग्यसेवा**

| | |
|---|---|
| एकूण आरोग्य शिबिरे | : ७,१५९ |
| एकूण लाभार्थी रुग्ण | : ३,२६,००१ |
| एकूण पुरुष लाभार्थी | : १,५६,५६० |
| एकूण महिला लाभार्थी | : १,४१,१०८ |
| लहान बालक लाभार्थी | : २८,३३३ |
| संदर्भित रुग्ण | : ९,६६० |
| एकूण रक्तदान शिबिरे | : ९५ |
| एकूण रक्तदाते | : ६,८६२ |
| सर्वाधिक शिबिरे | : सोलापूर -१२३६ |
| सर्वाधिक रुग्ण तपासणी | : सोलापूर-६२,१८१ |
| सर्वाधिक संदर्भित रुग्ण | : पुणे -१५९९ |
| सर्वाधिक रक्तसंकलन | : पुणे - १६५० |
| बालकांचा सर्वाधिक सहभाग | : पुणे - ७८५० |

# राष्ट्रीय स्वास्थ अभियानाच्या कर्मचाऱ्यांसाठी पुणे मनपात एच. आर. पॉलिसीची अंमलबजावणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेत राष्ट्रीय स्वास्थ अभियान (छक्क्) अंतर्गत कार्यरत सुमारे साडेपाचशे कर्मचाऱ्यांना अखेर एच.आर. पॉलिसीचे लाभ मिळणार आहेत.

**RMS चा लढा आणि यश**

महाराष्ट्र शासनाने ही पॉलिसी राज्यभर लागू केली होती, मात्र पुणे महानगरपालिकेतील राष्ट्रीय स्वास्थ अभियानातील कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळत नव्हता. या अन्यायकारक परिस्थितीविरोधात राष्ट्रीय मजदूर संघ (ठचड) अध्यक्ष तथा कामगार नेते सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने आवाज उठवण्यात आला.

याच संदर्भात ऑगस्ट महिन्यात पुणे महानगरपालिकेचे




आयुक्त मा. नवल किशोर राम यांच्या दालनात संघटनेची बैठक झाली होती. त्या वेळी आयुक्तांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाला सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने एच.आर. पॉलिसी लागू करण्याचे आश्वासन दिले होते.

आज त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या डॉ. नीना बोराडे (मुख्य आरोग्य अधिकारी), डॉ. मनीषा नाईक (सहाय्यक आरोग्य अधिकारी), डॉ. गणेश जगदाळे यांनी एच.आर. पॉलिसीचे अधिकृत परिपत्रक राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष कामगार नेते सुनील शिंदे यांना सुपूर्द केले. या प्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष सिताराम चव्हाण, सरचिटणीस एस. के. पळसे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

**कर्मचाऱ्यांना मिळणारे लाभ**

- ३० दिवसांची रजा
- पालकत्व रजा
- मातृत्व रजा
- दुर्धर आजार झाल्यास ३ महिन्यांची विशेष रजा
- तसेच इतर अनेक सुविधा

राष्ट्रीय स्वास्थ अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल पुणे मनपाचे आयुक्त मा. नवल किशोर राम, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोराडे व सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक यांचे राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांनी विशेष आभार मानले. या निर्णयामुळे पुणे मनपाच्या राष्ट्रीय स्वास्थ अभियानातील सुमारे साडेपाचशे कर्मचारी ¨ डॉक्टर्स, नर्सेस, डेटा एन्ट्री ऑपरेटर्स आणि इतर कर्मचारीवर्ग ¨ यांना मोठा दिलासा मिळणार असून, ही संघटित ताकदीचा विजय असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## खुनाचा प्रयत्नातील दोन आरोपींना अटक; दोन विधीसंघर्षीत बालक ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत फिर्यादी यांचा मुलगा हा त्यांचे मित्रांचे समवेत मोबाईलवर गेम खेळत होता. त्यावेळी दोन ते तीन दुचाकी गाडीवरील तीन ते चार अनोळखी इसमांनी येवुन फिर्यादी यांचे मुलास अज्ञात कारणांवरुन हत्याराने डोक्यात, कानावर, हातावर वार करुन गंभीर जखमी केले. याबाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाणे हद्दीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांनी तात्काळ तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक निलेश मोकाशी व पोलीस अंमलदार यांना आरोपीचा शोध घेणेबाबतच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार तपास पथकाचे अंमलदार मितेश चोरमोले, सागर बोरगे, अभिनय चौधरी यांनी घटनास्थळ व आजुबाजुचे सीसीटीव्ही कॅमेरांची पाहणी करुन गोपनिय माहीती घेतली. त्यामध्ये रेकॉर्डवरील आरोपी नामे करण शिवाजी जमादार (वय १९ वर्षे रा. सिंहगड कॉलेजजवळ, पॅरामाऊंन्ड कॅफेचे बाजुला, वडगाव बु,) याने व त्याचे इतर साथीदारांनी मिळुन गुन्हा केल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे करण जमादार याचा नमुद अंमलदारांनी शोध घेत असताना तो त्याचे साथीदार शुभम साधु चव्हाण (वय १९ वर्षे रा. जय बजरंग मित्र मंडळाशेजारी, रियांश सोसासटी, शेवटची बिल्डीग, फ्लॅट नंबर ५०३, आंबेगाव बु,) व दोन विधीसंघर्षीत बालकांसह मिळुन आल्याने त्यामध्ये करण शिवाजी जमादार व शुभम साधु चव्हाण यांना शुक्रवारी अटक करण्यात आले आहे. दोन विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेतले आहे.

## अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत देणार : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा मॉन्सून सक्रिय झाल्याने अनेक जिल्ह्यांना पावसाचा फटका बसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार बाधित भागात सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्यात असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे.राज्यात १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र (३६, ११, ८७२.५ एकर) बाधित झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. यामध्ये दि.१५ ते २० ऑगस्ट दरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेती पिकांचे जास्त नुकसान झाले आहे.

## मनोरुग्णालयात महिला रुग्णाची गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात रुग्ण वॉर्डात गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा घटना थांबलेल्या नाहीत. परभणी न्यायालयाच्या आदेशाने येरवडा मनोरुग्णालयात उपचार घेणाऱ्या महिला रुग्ण कैदीने अंगातील कपड्याने दोरी करून खिडकीला बांधून घेत गळफास घेऊन आत्महत्या केली.

गेल्या महिन्यात १० ऑगस्ट रोजी खूनाच्या गुन्ह्याखाली शिक्षा भोगणाऱ्या अंडरट्रायल मनोरुग्ण कैद्याने पायजमाच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे मनोरुग्णालयात रुग्णांची सुरक्षा चव्हाट्यावर आली आहे.

लक्ष्मी अशोक कुमार (वय.४५, रा.परनाला, जिल्हा - झज्जर, हरियाणा) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परभणी कारागृहात लक्ष्मी शिक्षा भोगत होती. तिची मानसिक संतुलन बिघडल्याने आणि हिंसक स्वभावामुळे कारागृहाने तिच्यावर उपचाराची गरज असल्याची विनंती न्यायालया केली होती.परभणी न्यायालयाच्या आदेशाने लक्ष्मी हिला ३१ जुलै रोजी येरवडा मनोरुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

गेल्या बुधवाररोजी लक्ष्मी ही वार्डात असताना अंगावरील कपडे काढून त्याची दोरी करून खिडकीला बांधली आणि गळफास घेऊन आत्महत्या केली. महिला रुग्णाने गळफास घेतल्याचे समजताच डॉक्टरांची पथक धावत वॉर्डात गेले. तिची वैद्यकीय तपासणी केली असता मृत झाली होती. प्रशासनाने तातडीने येरवडा पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलीस घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदन साठी ससून रुग्णालयात नेले. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

## वाघोली - केसनंद रस्त्याची अक्षरश: चाळण

पुणे :महापालिकेत समावेश झालेल्या वाघोली - केसनंद रस्त्याची खड्ड्यांमुळे अक्षरशः चाळण होऊन मोठी दुरावस्था झाली आहे.त्यामुळे वैतागलेल्या नागरिकांनी प्रशासन निषेधार्थ आंदोलन केले. तसेच.खड्ड्यात वृक्ष लावुन प्रशासनाचा निषेध केला.

काळे ओढा परिसरात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग व महापालिकेच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आम्हाला रस्त्याची डागडुजी नको तर नवीन काँक्रिट रस्ता हवा अशी मागणी यावेळी करण्यात आली. या रस्त्याबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांवर अनेक वेळा डांबर टाकून झाले. मात्र पाऊस पडला की डांबर वाहून पुन्हा खड्डे पडतात. या खड्ड्यांमुळे वाहतूक मंद झाली असून अनेक वेळा कोंडी होते. अनेक इच्छुकांनी या खड्ड्यांवर महापालिकेकडून डांबर मागवून ते टाकले. त्याचे व्हिडिओ व्हायरल केले. मात्र पावसाने पुन्हा खड्डे उघडे केल्याने इच्छुकही आता शांत झाले आहेत. या रस्त्यावर केसनंद फाटा ते आयुर्वेदिक कॉलेज पर्यंत काँक्रीटीकरणाचे काम करण्याची गरज आहे. हा रस्ता लवकर झाला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# महापालिकेचे नेहरूनगरमध्ये मोफत महाआरोग्य शिबिर

## ३०० हून अधिक नागरिकांचा सहभाग; विविध तपासण्या, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व औषधांचे मोफत वितरण






**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे नेहरूनगर येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ३०० हून अधिक नागरिकांनी वैद्यकीय सेवा व विविध तपासण्यांचा लाभ घेतला.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे उद्घाटन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, नोडल ऑफिसर डॉ. छाया शिंदे, डॉ. गोविंद नरके, पीएचएन यशस्विता बाणखेले तसेच वायसीएम हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर, आशा सेविका, परिचारिका उपस्थित होते.

शिबिराचे आयोजन यशवंतराव चव्हाण स्मृती हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांसाठी रक्त तपासणी, लसीकरण, एक्स-रे, गरोदर मातांची तपासणी, आभा व आयुष्मान कार्ड नोंदणी अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, दंतरोग, नाक-कान-घसा तज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाचा लाभ नागरिकांना घेता आला. सर्व तपासण्यांसोबत आवश्यक औषधांचे मोफत वितरणही करण्यात आले.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या अशा मोफत आरोग्य तपासणी शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना वैद्यकीय सुविधा सहज उपलब्ध होतात. समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे हा महापालिकेचा उद्देश असून यासाठी सातत्याने महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून मोफत आरोग्य तपासणी शिबिरासोबतच इतर वेगवेगळे विविध उपक्रम राबवण्यात येतात.
> -विजयकुमार खोराटे,
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> “ मोफत महाआरोग्य शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध तपासण्या, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व औषधोपचार मिळतात. अशा शिबिरांमुळे आरोग्य तपासणीबाबतची सवय निर्माण होते आणि रोग वेळेत निदान होऊन उपचार होण्यास मदत मिळते.
> - डॉ. लक्ष्मण गोफणे,
> आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका